RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ६, अंक ११०] शुक्रवार, नोव्हेंबर १३, २०२०/कार्तिक २२, शके १९४२ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २७१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ नोव्हेंबर २०२०

**अधिसूचना**

**महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम, १९७६.**

क्रमांक पविआ-१०२०/प्र.क्र.१४/पदुम-३.—महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा.९) याच्या कलम ४ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे शासन अधिसूचना कृषि व सहकार विभाग, क्रमांक एपीए. १०८९/३४०९९/(२४६)/एएच-३, दिनांक २४ जुलै १९८७ मध्ये पुढील सुधारणा करण्यात येत आहे :—

उक्त अधिसूचनेला जोडलेल्या अनुसूचीनंतर खालीलप्रमाणे मजकूराचा अंतर्भाव करण्यात येत आहे ;

२. महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा (सुधारणा) १९९५ च्या अनुसूचीमध्ये अंतर्भुत असणाऱ्या प्राण्यांच्या कत्तलीसंदर्भात कत्तलपूर्व तपासणी करीता सक्षम प्राधिकारी :—

(अ) मांस निर्यातीकरिता, APEDA अथवा केंद्र शासनाच्या तत्सम प्राधिकरणांद्वारे प्राधिकृत असलेल्या राज्यातील अधिकृत कत्तलखान्यांनी नियुक्त केलेल्या, भारतीय पशुचिकित्सा अधिनियम, १९८४ मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत असलेल्या ; सोबत जोडलेल्या प्रपत्र - अ मध्ये नमूद खाजगी पशुवैद्यकांना ; संबंधित कत्तलखान्याकरिता महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा (सुधारणा) १९९५ च्या अनुसूचीमध्ये अंतर्भुत असणाऱ्या प्राण्यांच्या कत्तलीसंदर्भात कत्तलपूर्व तपासणी करण्यासाठी “ सक्षम प्राधिकारी ” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(ब) महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा (सुधारणा) १९९५ व प्राणी क्लेष प्रतिबंधक (कत्तलखाना) नियम, २००१ च्या सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी, वर (अ) मध्ये सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केलेल्या भारतीय पशुचिकीत्सा अधिनियम, १९८४ मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत पशुवैद्यकिय पदवीधरांची व संबंधित कत्तलखान्यांची राहील.

(क) वर (अ) मध्ये नमूद सक्षम प्राधिकारी, त्यांचा नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यास अथवा, त्यांची नियुक्ती रद्द झाल्यास ते सक्षम प्राधिकारी म्हणून कार्य करू शकणार नाहीत.

**प्रपत्र - अ**

| अ.क्र. | खाजगी पशुवैद्यकाचे नाव | कार्यक्षेत्र | नियुक्तीचा कालावधी |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | डॉ. महेश मनोहर राजूरकर | मे. फेअर एक्सपोर्ट | अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या |
| २ | डॉ. अलोक राजन | इंडिया प्रा.लि. चा | दिनांकपासून ११ महिने |
| ३ | डॉ. विशाखा कैलास कापसे | दरेगाव, ता. मालेगाव, | |
| ४ | डॉ. स्नेहा विष्णुजी आडे | जि. नाशिक येथील | |
| ५ | डॉ. अमय दिपक दिपाळे | कत्तलखाना | |
| ६ | डॉ. खुशवंत थोरात | | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**समीर सावंत,**
शासनाचे अवर सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDARY, DAIRY DEVLOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

*NOTIFICATION*

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya (Annex), Mumbai 400 032, dated 13th November 2020

MAHARASHTRA ANIMAL PRESERVATION ACT, 1976

No. PAVIA. 1020/C.R.14/ADF-3.—In exercise of the powers conferred by the section 4 of the Maharashtra Animal Preservation Act, 1976 ( Mah. IX of 1977) and all of other powers enabling it in this behalf , the Government of Maharashtra hereby amends, the Government Notification, Agriculture and Co-operation Department, No.APA.1089/34029 I (246)/AH-3, Dated the 24th July 1987, namely :—

After the Schedule, appended to the said notification, following matter has been inserted ;

2. Appointment of the officers to perform the functions of " Competent Authority " under the said Act ;

(*a*) The Veterinary Private Practitioners; mentioned in Annexure – A; registered under provisions of the Veterinary Council Act, 1984 are hereby declared as the " Competent Authority " to perform the Ante-mortem examination of animals incorporated in the Schedule of Maharashtra Animal Preservation (Amendment) Act, 1995 to be slaughtered at concerned slaughterhouse authorized by APEDA or other similar Authorities of Central Government for the purpose of meat export.

(*b*) Responsibility to strictly abide by all the provisions of Maharashtra Animal Preservation (Amendment) Act 1995 and Prevention of Animals Cruelty to Animals (Slaughterhouse) Rules, 2001, rests with Veterinary graduates registered as per the provisions of Indian Veterinary Act, 1984 declared hereby as " Competent Authority " mentioned above in (*a*) at the concerned slaughterhouses.

(c) The " Competent Authority " mentioned above in (*a*), will not be able to act as the " Competent Authority " after the completion of period of their appointment or, cancellation of their appointment.

**ANNEXURE – A**

| Sr. No. (1) | Name of Private Veterinary Practitioner (2) | Jurisdiction (3) | Period of Appointment (4) |
|---|---|---|---|
| 1 | Dr. Mahesh Manohar Rajurkar | M/s. Fair the date of Export India Pvt. Ltd. owned slaughter house at Daregaon, Tahsil Malegaon, Dist. Nashik | 11 Months from publication of this notification |
| 2 | Dr. Alok Rajan | | |
| 3 | Dr. Vishakha Kailas Kapse | | |
| 4 | Dr. Sneha Vishnuji Ade | | |
| 5 | Dr. Amay Dipak Dipale | | |
| 6 | Dr. Khushvant Thorat | | |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SAMEER SAWANT,
Under Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.